# NAGPUR CITY POLICE COMMISSIONERATE

नागपूर शहर पोलीस आयुक्तालय

**(पोलीस वार्तापत्र)**

(दुपार)

**दिनांक ११.०९.२०२६ शुक्रवार**

**१) पोलीस भवन परीसरात डॉल्बी साऊंड च्या ध्वनीपातळीची प्रत्यक्ष तपासणी व प्रात्यक्षिक :—**

आगामी येणारे सण उत्सव तान्हापोळा, ताजुद्दीनबाबा छब्बीसी, श्रीगणेश उत्सव आगमण व विसर्जन मिरवणुका, धम्मचक्र प्रवर्तन दिन, दुर्गाउत्सव आगमण व विसर्जन मिरवणुकांचे अनुषंगाने ध्वनिक्षेपक व डॉल्बी साऊंडचे वापराबाबत निर्धारीत ध्वनीमर्यादांचे पालन होणे आवश्यक आहे. याअनुषंगाने मा. श्री. विश्वास नांगरे पाटील, पोलीस आयुक्त, नागपूर शहर, यांचे प्रमुख उपस्थितीत दिनांक १०.०९.२०२६ चे १०.०० वा. ते १६.०० वा. दरम्यान, पोलीस आयुक्तालय, पोलीस भवन परिसरात डॉल्बी साऊंडच्या ध्वनीपातळीची प्रत्यक्ष तपासणी व प्रात्यक्षिके आयोजीत करण्यात आलेली होती. प्रात्यक्षिक दरम्यान साऊंड मेजरींग मशीन चे सहाय्याने डॉल्बी साऊंडची प्रत्यक्ष डेसिबल पातळी मोजण्यात आली. याप्रसंगी महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाच्या विभागीय अधिकारी मा. हेमा देशपांडे व त्यांचे पथक तसेच, संबंधीत अधिकारी उपस्थीत होते. याप्रसंगी नागरीकांना तसेच, मंडळाचे पदाधिकारी, सदस्य व ध्वनिक्षेपकाचा वापर करणारे यांना निर्धारीत ध्वनी मर्यादांचे काटेकोर पालन करून, उत्सव साजरे करण्याचे आवाहन मा. पोलीस आयुक्तांनी केले. तसेच, नियमांचे उल्लंघन झाल्यास योग्य त्या कायद्यानुसार संबंधीतावर कारवाई करण्यात येईल असे सांगीतले.

प्रात्यक्षिकास मा. श्री. नविनचंद्र रेड्डी सह. पोलीस आयुक्त नागपूर शहर, मा. श्री. राजेंद्र दाभाडे अपर पोलीस आयुक्त (गुन्हे) नागपूर शहर, मा. श्री. दीपक अग्रवाल, पोलीस उप आयुक्त (डिटेक्शन), मा. श्री. डॉ. संदीप पखाले, पोलीस उप आयुक्त (विशेष शाखा), महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाच्या विभागीय अधिकारी मा. हेमा देशपांडे व त्यांचे पथकातील अधिकारी, नागरीक, पोलीस अधिकारी व अंमलदार उपस्थीत होते.





**२) परिमंडळ क्र. ०३ चे हद्दीतुन एकुण १९२ गुन्हेगार तात्पुरते हद्यपार :—**

नागपूर शहरातील पोळा व तान्हा पोळा त्याचप्रमाणे श्री गणेशोत्सव या सण/उत्सवाचे अनुषंगाने कायदा व सुव्यवस्था अबाधित राहणेकामी पोलीस उप आयुक्त, परिमंडळ क्र. ०३, नागपूर शहर अंतर्गत पोलीस ठाणे कोतवाली, गणेशपेठ, तहसिल, लकडगंज, शांतीनगर व पाचपावली हद्दीतील शरीराविरूध्द, मालमत्तेविरूध्द गुन्हे करणारे तसेच अवैध दारू विक्री करणारे एकुण १९२ इसमांना त्यांचेकडून सार्वजनिक शांततेचा भंग होण्याची दाट शक्यता असल्याने मा. श्री. राहुल माकणीकर, पोलीस उप आयुक्त, (अती.कार्य.परि.क्र.०३), नागपूर शहर

यांचेकडून त्यांना प्राप्त विशेष कार्यकारी दंडाधिकारी पदाच्या अधिकारांन्वये कलम १६३(२) भा.ना.सु.सं. अन्वये **दिनांक ०८.०९.२०२६ ते २६.०९.२०२६ पर्यंत १९ दिवसांचे कालावधीकरीता** त्यांना नागपूर शहराचे हद्दीत राहण्यास परावृत्त करण्यात आले आहे. आरोपींमध्ये पोलीस ठाणे कोतवाली—२०, गणेशपेठ—१२, तहसिल—५२, लकडगंज—०२, शांतीनगर—२३, पाचपावली—४५ असे एकूण १९२ गुन्हेगारांचा समावेश असून, त्यांना नमुद कालावधीचे दरम्यान पोलीस ठाणे कार्यक्षेत्रात प्रवेश न करण्याबाबत आदेशीत करण्यात आलेले आहे. गुन्हेगारांनी हद्यपार आदेशाचा भंग करुन सार्वजनिक शांततेला बाधा आणणारी कोणतीही कृती केल्यास किंवा नागपूर शहरात प्रवेश केल्यास त्यांचेविरुध्द कठोर कारवाई करण्यात येईल.

पोलीस प्रशासनातर्फे नागरीकांना आवाहन करण्यात येते की, पोलीस प्रशासन हे सर्व सण—उत्सव शांततापुर्ण व सुरक्षित वातावरणात पार पडावेत याकरीता कटीबध्द आहे. नागरीकांनी कोणत्याही अफवांवर विश्वास ठेवु नये तसेच, कोणतीही संशयास्पद हालचाल आढळल्यास तात्काळ नजीकच्या पोलीस ठाण्यास किंवा डायल ११२ वर माहीती कळवावी.

**(कामगिरी)**

**१) नागपूर शहर पोलीसांची म.दा.का., जुगार व मोटर वाहन कायद्याअंतर्गत करण्यात आलेली कारवाई :—**

दिनांक १०.०९.२०२६ रोजी, नागपूर शहर पोलीसांनी सर्व पोलीस ठाणे हद्दीत, म.दा.का. व अंमली पदार्थ कायद्यान्वये ४७ केसेसमध्ये ४८ ईसमावर कारवाई करून एकुण २,६७,१००/—रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला. जुगार कायदा अन्वये ०८ केसेसमध्ये ४३ इसमांवर कारवाई करून एकुण १७,११,०९०/—रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

**वाहतुक शाखा पोलीसांनी मोटार वाहन कायद्यान्वये ड्रंकन ड्राईव्ह व विविध कलमांखाली २,२९३ वाहन चालकांवर कारवाई करून, एकूण रू. ७,७७,४००/—रू. ची तडजोड शुल्क वसूल केले आहे.**

वरील सर्व मोहीम एकत्रितरित्या नागपूर शहर पोलीसांतर्फे राबविण्यात आल्या असून, यापुढेही प्रभावीपणे कारवाई करण्यात येणार आहे. वाहन चालकांनी वाहन चालवितांना वाहतुकीचे नियम पाळुन वाहनासंबंधी सर्व कागदपत्रे जवळ बाळगावित, असे नागरीकांना आवाहन करण्यात येत आहे.

**२) परिमंडळ क्र. १ पोलीस ठाणे वाडी अंतर्गत दाखल खुनाचा प्रयत्न करणारे अट्टल गुन्हेगारांविरूध्द मकोका अंतर्गत कारवाई.**

पोलीस ठाणे वाडी हद्दीत लोकमान्य टिळक शाळेमागील पाण्याचे टाकीजवळ इंद्रायणी नगर, दत्तवाडी, नागपुर येथे फिर्यादी प्रतीक राजेश शेंडे, वय ३० वर्षे, रा. प्लॉट नं. २०, दीपकमल सोसायटी, त्रिलोक नगर, वाडी, नागपुर हे दिनांक २९.०८.२०२६ चे १६.०० वा. चे सुमारास, त्यांचे मित्रासोबत बोलत असतांना, आरोपी क्र. १) नितेश प्रकाश सोनटक्के, वय २० वर्षे, रा. प्लॉट नं. ८३, इंद्रायणी नगर, दत्तवाडी, नागपुर याने फिर्यादी व त्यांचे मित्रासोबत बाचाबाची करून, शिवीगाळ केली व पाहुन घेण्याची धमकी दिली होती. दिनांक २९.०८.२०२६ चे २१.३० वा. चे सुमारास, आरोपी क्र. १ याने त्याचे साथीदार क्र. २) आभास नितेश वाघमारे, वय १९ वर्षे, रा. प्लॉट नं. १७८, धम्मकिर्ती नगर, दत्तवाडी, नागपुर ३) विक्रांत उर्फ विक्की भाऊराव दळवे, वय १९ वर्षे, रा. गुरूप्रसाद नगर, दत्तवाडी, नागपुर यांनी संगणमत करून, फिर्यादीस जिवे ठार मारण्याच्या उद्देशाने चाकु व लाकडी दांड्याने मारहाण करून गंभीर जखमी करून जिवे मारण्याचा प्रयत्न केला. फिर्यादीचे तक्रारीवरून पोलीस ठाणे वाडी येथे आरोपीविरूध्द कलम १०९(१), ३(५) भा.न्या.सं., सहकलम १३५ म.पो.का. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता.

गुन्हयातील तिन्ही आरोपी हे टोळीचे सदस्य आहेत. आरोपी हे कोणताही समाजमान्य कामधंदा न करता, त्यांनी नागपुर शहरात खुनाचा प्रयत्न, अश्लील शिवीगाळ करणे, मारहाण करणे, अवैद्य हत्यार बाळगणे असे

मालमत्तेविरूध्द व शरीराविरूध्द वेगवेगळे गुन्हे केल्याचे निष्पन्न झालेले आहे. आरोपी हे अत्यंत निर्ढावलेले असुन, त्यांचे कृत्याने सामान्य नागरीकांचे मनात जिवीत व मालमत्तेविषयी असुरक्षिततेची भावना व भिती निर्माण झालेली आहे. त्यामुळे वाडी पोलीसांनी आरोपींविरूध्द महाराष्ट्र संघटीत नियंत्रण कायदा अन्वये प्रस्ताव तयार करून मा. पोलीस उपायुक्त परिमंडळ क्र. १, नागपुर शहर यांचे मार्फतीने सादर करण्यात आला होता. मा. वरिष्ठांचे आदेशाने गुन्ह्यामध्ये कलम ३(१)(ii),३(२),३(४) महाराष्ट्र संघटीत नियंत्रण कायदा– १९९९ (मकोका) अन्वये कलमवाढ करण्यात आली आहे. पुढील तपास सुरू आहे.

वरील कामगिरी मा. श्री. विश्वास नांगरे पाटील, पोलीस आयुक्त, नागपूर शहर, मा. श्री. नविनचंद्र रेड्डी सह. पोलीस आयुक्त नागपूर शहर, मा. श्री. वसंत परदेशी अपर पोलीस आयुक्त (दक्षिण प्रभाग), मा. श्री. सिंगा रेड्डी ऋषीकेश रेड्डी पोलीस उप आयुक्त (परि.क्र. १), मा. श्री. यशवंत नलावडे सहायक पोलीस आयुक्त (एमआयडीसी विभाग) यांचे मार्गदर्शनाखाली, वपोनि. नितीन मगर, दुपोनि. रामेश्वर दराडे, सपोनि. कुणाल धुरट, साईप्रसाद केंद्रे, पोहवा. कमलेश ठाकरे, रोशन फुकट, राहुल बोटरे, धर्मेंद्र यादव, सोमेश्वर वर्धे, पोअं. विनोद कुंभलकर यांनी केली आहे. गुन्हेगारी प्रवृत्ती करणारे तसेच, संघटीत गुन्हेगारी करणारे गुन्हेगारांविरूध्द नागपुर शहर पोलीसांची शुन्य सहनशिलता (झिरो टॉलेरन्स) भुमिका कायम राहणार आहे.

**<u>३) सक्करदरा पोलीसांची कामगिरी :– जबरी चोरी करणाऱ्या आरोपीस तात्काळ अटक.</u>**

फिर्यादी गणपती विठोबाजी उमरेडकर, वय ५९ वर्षे, रा. रमना मारोती मंदीर जवळ, नंदनवन, नागपुर हे एस.बि.आय. ब्रांच सक्करदरा येथे कॅश ऑफीसर म्हणुन कार्यरत आहेत. दिनांक १०.०९.२०२६ चे १८.०० वा. चे सुमारास, त्यांनी बॅकेला लागुन असलेल्या सिडीएम मशीनमधील कॅश काढुन बॅकेत आले व काऊंटर नं. ३ येथे दिवसभर झालेल्या व्यवहाराचे रिपोर्ट काढत असतांना, अचानक एक २५ ते २६ वर्षीय ईसमाने येवुन तेथे उभ्या असलेल्या ईतर बॅक कर्मचारी महीलांचे व फिर्यादीचे डोळ्यावर त्याचे हातातील पिशवीतुन मिरची पावडर काढुन फेकली. फिर्यादी हे मागे सरकुन लाकडी दंडा घेण्यास वळले असता, त्या अनोळखी ईसमाने काऊंटर नं. ४ वरून उडी मारून टेबलवरील कॅश पिशवीमध्ये भरून, फिर्यादीस शस्त्राचा धाक दाखवुन पळुन गेला. फिर्यादी यांनी आरडा–ओरड केला परंतु आरोपी पळुन गेला. फिर्यादी यांनी पोलीसांना सुचना देवुन, टेबलवरील ठेवलेली रक्कम मोजली असता, एकुण रकमेपैकी, त्या आरोपीने ४,५३,०००/–रू. रोख जबरीने हिसकावुन, पळुन गेल्याचे दिसुन आले.

दरम्यान पेट्रोलींग करणारे सक्करदरा येथील बिटमार्शल व तपास पथकातील पोहवा. टप्पुलाल चुटे, शैलेष बेलेकर, राजेंद्र मोहोड व पोअं. शदरसिंग टेंभरे असे बॅकेजवळ गेले असता, त्यांना घडलेला प्रकार समजल्याने त्यांनी आरोपीचे वर्णन घेवुन, तो पळालेल्या दिशेने जावुन शोध घेतला असता, ईसम दिसल्याने त्याचा पाठलाग करून त्यास ताब्यात घेतले. त्यास पोलीस ठाणे येथे आणुन, पंचासमक्ष त्याचे नांव पत्ता विचारले असता, त्याने त्याचे नांव सुरज भोजराज बोरकर, वय २८ वर्षे, रा. गाव तातोली, तह. भिवापुर, जि. नागपुर असे सांगीतले. त्याचे जवळील पिवळ्या रंगाचे पिशवीची पाहणी केली असता, त्यामध्ये रोख ४,५३,०००/–रू. मिळुन आली. आरोपीचे अंगझडतीत त्याचे ताब्यातुन ०१ ऑरेंज पिवळ्या रंगाचे लोखंडी कटर, लोखंडी भाल्याचे पाते, लोखंडी सळाख, ०१ नायलॉन दोरी, मिरची पावडर पॅकेट असा मुद्देमाल मिळुन आल्याने जप्त करण्यात आला.

याप्रकरणी फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे सक्करदरा येथे आरोपीविरूध्द कलम ३०९(४) भा.न्या.सं. अन्वये गुन्हा दाखल करून, आरोपीस अटक करण्यात आलेली आहे.

**<u>४) गुन्हेशाखा अंमली पदार्थ विरोधी पथकाची कामगिरी :– एम.डी. पावडर बाळगणाऱ्या आरोपीस अटक.</u>**

दिनांक १०.०९.२०२६ चे १८.३० वा. ते २०.४० वा. चे दरम्यान, गुन्हेशाखा अंमली पदार्थ विरोधी पथकाचे अधिकारी व अंमलदार हे पेट्रोलींग करीत असतांना, त्यांना मिळालेल्या खात्रीशीर माहीतीवरून, त्यांनी पोलीस ठाणे नंदनवन हद्दीत देशपांडे ले—आऊट, एनआयटी गार्डन समोर रोडलगत एका दुचाकी मोपेडवरील इसमांना थांबवुन, पंचासमक्ष त्यांचे नाव पत्ता विचारले असता, त्यांनी त्यांचे नांव १) सुनिल हरबंसलाल जुनेजा, वय ३८ वर्षे, रा. शास्त्री नगर, जुना बडगंज, नागपूर २) अतुल दिलीप शेंडे, वय ३२ वर्षे, रा. बनकर दवाखान्याजवळ, शास्त्री नगर, नंदनवन, नागपुर असे सांगीतले. त्यांचेजवळ अंमली पदार्थ असल्याचे दाट संशयावरून, त्यांची झडती घेतली असता, त्याचे ताब्यात झिपलॉक पन्नीमध्ये एकुण २७ ग्राम ४०० मि.ग्रॅम एम. डी. पावडर मिळून आली. आरोपींचे ताब्यातुन एम.डी. पावडर, ०२ मोबाईल फोन व मोपेड वाहन असा एकुण १,६२,२००/—रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला. आरोपींना अधिक विचारपुस केली असता, त्यांनी नमुद एमडी पावडर ही त्यांचा साथीदार पाहीजे आरोपी नामे निहाल उर्फ बाबा शेंडे, वय ३० वर्षे, रा. म्हाळगी नगर, नागपुर याचे मदतीने विक्रीकरीता आणल्याचे सांगीतले. आरोपी हे स्वत:चे आर्थिक फायद्याकरीता एम.डी. पावडर विक्री करण्याकरीता बाळगताना समक्ष मिळुन आला. आरोपींचे कृत्य हे कलम ८(क), २२(ब), २९ एन.डी.पी. एस. ॲक्ट नुसार होत असल्याने, आरोपींविरूध्द पोलीस ठाणे नंदनवन येथे गुन्हा नोंदविण्यात आलेला आहे. आरोपींना अटक करण्यात आली आहे. आरोपींना मुद्देमालासह पुढील कारवाईस्तव नंदनवन पोलीसांचे ताब्यात देण्यात आले आहे. पाहीजे आरोपीचा शोध व पुढील तपास सुरू आहे.

वरील कामगिरी मा. श्री. विश्वास नांगरे पाटील, पोलीस आयुक्त, नागपूर शहर, मा. श्री. नविनचंद्र रेड्डी सह. पोलीस आयुक्त नागपूर शहर, मा. श्री. राजेंद्र दाभाडे अपर पोलीस आयुक्त (गुन्हे) नागपूर शहर, मा. श्री. दीपक अग्रवाल, पोलीस उप आयुक्त (डिटेक्शन), मा. श्री. वैभव जाधव, सहा. पोलीस आयुक्त (गुन्हेशाखा) यांचे मार्गदर्शनाखाली, पोनि. भारत क्षिरसागर व त्यांचे पथकाने केली.



**(गुन्हे)**

**१) पोलीस ठाणे वाडी :— हद्दपार ईसमास अटक.**

दिनांक १०.०९.२०२६ चे २३.२५ चे सुमारास, वाडी पोलीसांचे बिटमार्शल व तपास पथक हे पोलीस ठाणे हद्दीत पेट्रोलींग करीत असता, त्यांना माहीती मिळाली की, दहा नंबर नाका, सुरींदर ढाबा जवळ, वाडी येथे एक हद्दपार इसम फिरत आहे. अशा मिळालेल्या खात्रीशीर माहीतीवरून, नमुद ठिकाणी गेले असता, तेथे मिळालेल्या वर्णनाचा इसम पोलीसांना पाहुन पळुन जात असता, त्यास पाठलाग करून ताब्यात घेतले. पंचासमक्ष त्याचे नाव पत्ता विचारले असता, त्याने त्याचे नाव प्रज्वल उर्फ धम्मा अनिल बागडे, वय २६ वर्षे, रा. रमाबाई चौक, आंबेडकर नगर, वाडी, नागपूर असे सांगीतले. त्यास पोलीस ठाणे येथे आणुन, त्याचा गुन्हे अभिलेख तपासला असता, त्यास पोलीस उप आयुक्त परिमंडळ क्र. ०१ यांचे हद्दपार आदेश क्र. ३७२७/२०२४ दिनांक १२.११.२०२४ अन्वये नागपुर शहर व ग्रामीण हद्दीतुन ०२ वर्षाकरीता हद्दपार केल्याचे दिसुन आले. आरोपी हा

हद्दपार असतांना कोणतीही परवानगी न घेता पोलीस ठाणे हद्दीत कोणतातरी गुन्हा करण्याचे उद्देशाने समक्ष मिळुन आल्याने व त्याने मनाई आदेशाचे उल्लंघन केल्याने, फिर्यादी पोअं. विनोद कुंभलकर यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे वाडी येथे मपोउपनि. उमा कोटामे ९५७९४७०५४३ यांनी आरोपीविरूध्द कलम १४२ म.पो.का. अन्वये गुन्हा दाखल करून, आरोपीस अटक केली आहे. पुढील तपास सुरू आहे.

**२) पोलीस ठाणे राणाप्रतापनगर :— जुगार खेळणाऱ्या आरोपींविरूध्द गुन्हा दाखल.**

दिनांक ११.०९.२०२६ चे ०२.२० वा. ते ०३.०० वा. चे दरम्यान, पोलीस ठाणे राणाप्रताप नगर येथील तपास पथकातील अधिकारी व अंमलदार यांना खात्रीशीर माहिती मिळाली की, पोलीस ठाणे हद्दीत मंगलमुर्ती चौक, आकृती हॉस्पीटल जवळील सुकुन फॅमिली हॉटेल येथील रूममध्ये काही इसम ताशपत्त्यांवर पैशांची बाजी लावून हार—जीतचा जुगार खेळत आहेत. अशा प्राप्त माहितीवरुन घटनास्थळी पंचासमक्ष रेड कारवाई केली असता, त्याठिकाणी आरोपी क्र. १) प्रणव किशोर उज्जैनकर, वय २३ वर्षे, रा. सुभाष नगर, कामगार कॉलोनी २) अस्मीत राजेंद्र बागडे, वय २४ वर्षे, रा. संत तुकडोजी नगर ३) अमीत दद्दु पसेरकर, वय २२ वर्षे, रा. सुभाष नगर, कामगार कॉलोनी, ४) प्रणय नत्थुजी माकडे, वय २६ वर्षे, रा. जयताळा आखरी बस स्टॉप, ५) रजत राजेंद्र सातपुते, वय ३० वर्षे, रा. प्लॉट नं. १, सुभाष नगर, ६) बॉबी अनिल घाटे, वय २८ वर्षे, रा. सुभाष नगर, कामगार कॉलोनी हे ताशपत्यावर पैश्यांची बाजी लावुन हार—जीतचा जुगार खेळतांना समक्ष मिळुन आले. आरोपींचे ताब्यातुन रोख २१,५००/—रू, ०३ वेगवेगळया कंपनीचे मोबाईल, ५२ ताश पत्ते व इतर साहित्य असा एकुण ५८,५५०/—रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला. आरोपींविरूध्द पोलीस ठाणे राणाप्रताप नगर येथे कलम ४, ५ महा. जुगार प्रति. अधिनियम अन्वये गुन्हा दाखल केला आहे. पुढील तपास सुरू आहे.

**३) पोलीस ठाणे कपीलनगर :— प्राणांतिक अपघात करणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल.**

दिनांक ०९.०९.२०२६ चे २१.४५ वा. चे सुमारास, फिर्यादीचे भाऊ नामे भारत शंकर शाहु, वय ३३ वर्षे, रा. भिलगांव, रामवाटीका, पाणी टाकी जवळ, यशोधरानगर, नागपुर हे त्यांचे अ‍ॅक्टीवा मोपेड क्र. एम.एच. ४० बिएफ ८००७ ने पोलीस ठाणे कपीलनगर हद्दीत, नाका नं. ०२ चौक, कामठी रोड येथुन जात असतांना, टाटा पंच कार क्र. एमएच ४० सिएच ८९०६ चा चालक नामे निखील दुर्गाप्रसाद भारतीय, वय ३७ वर्षे, रा. प्लॉट नं. ११२, सोनु बार मागे, येरखेडा, नागपुर याने त्याचे ताब्यातील कार भरधाव वेगाने व निष्काळजीपणे चालवुन फिर्यादीचे भावाचे मोपेडला समोरून धडक दिली. अपघातामध्ये फिर्यादीचे भाऊ खाली पडुन गंभीर जखमी झाले. जखमी यांना उपचाराकरीता मेडीकल हॉस्पीटल येथे नेले असता, उपचारादरम्यान डॉक्टरांनी त्यांना तपासुन मृत घोषीत केले.

यांप्रकरणी फिर्यादी श्रीमती भावना विजय कडु, वय ३७ वर्षे, रा. शिवनगरी सोसायटी, १६—बि, भिलगांव, यशोधरानगर, नागपुर यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे कपीलनगर येथे मपोउपनि. शिवाली उलमाले ९२२६००३४४१ यांनी कारचालक आरोपीविरूध्द कलम १०६(१) भा.न्या.सं., सहकलम १८४ मो.वा.का. अन्वये गुन्हा दाखल केला आहे. पुढील तपास सुरू आहे.

**स्वा/—**

**( नितीन चुलपार )**
**सहा.पोलीस निरीक्षक,**
**पोलीस जनसंपर्क अधिकारी,**
**नागपुर शहर.**